RNI No. MAHBIL /2009/35530

Reg. No. MH/MR/South-341/2014–16

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक २५]  मंगळवार, ऑगस्ट २६, २०१४/भाद्र ४, शके १९३६  [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६०**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| **सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**——फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. | १–२ |

दिनांक ३ ऑगस्ट २०१४ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. सईद,**
सचिव व विधी परामर्शी,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३.**

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २६ ऑगस्ट २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९७४ चा २. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९७४ चा अधिनियम, क्रमांक २ याच्या कलम २४ ची सुधारणा.

**२.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २४ मधील,— १९७४ चा २.

(अ) पोट-कलम (६) मधील परंतुक वगळण्यात येईल ;

(ब) पोट-कलम (६) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(६-अ) पोट-कलम (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, पोट-कलमे (४) व (५) च्या तरतुदींच्या अधीन राहून, जी व्यक्ती सात वर्षांहून कमी नाही इतका काळ अधिवक्ता म्हणून व्यवसाय करीत असेल, अशा व्यक्तीस जिल्ह्यासाठी, सरकारी अभियोक्ता किंवा अपर सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करू शकेल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.